# MT EDUCARE LTD.

**QUEST- I (Semi Prelim - I)**
**2018 - 19**

**पाठ - १ ते ६, पद्य - १ ते ३ स्थूलवाचन - १, ३**
**व्याकरण, उपयोजित लेखन**

---

**CBSE - X** **Set - A**

**Roll No.** | | | | | | | |

**Code No. 52/1**

**Series LRH/1**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| • | खण्डः क | : | १. अपठित गद्‌य उतारा | |
| | | | २. अपठित गद्‌य उतारा | 12 गुण |
| • | खण्डः ख | : | रचनात्मक लेखन | |
| | | | १. निबंध लेखन किंवा कथालेखन | |
| | | | २. पत्र लेखन | |
| | | | | 12 गुण |
| • | खण्डः ग | : | व्याकरण | 16 गुण |
| • | खण्डः घ | : | साहित्य : गद्‌य, पद्‌य, स्थूलवाचन | 40 गुण |

***Time allowed* : 3 hours** ***Maximum Marks* : 80**

## MARATHI

**General Instructions :**

(१) चार खंड आहेत - क, ख, ग आणि घ.

(२) सूचनेप्रमाणे सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

(३) सूचनेप्रमाणे प्रश्न सोडवावेत.

## खंड 'क'

**Q.1. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

आई आणि वडील ही जीवनातील दोन सामर्थ्ये होत. भारतीय संस्कृतीत राष्ट्र, आचार्य, अतिथी, माता आणि पिता हे परम आदराचे विषय मानले आहेत. 'राष्ट्र देवो भव। आचार्य देवो भव' या मंत्राप्रमाणेच 'मातृ देवो भव । पितृ देवो भव' ही संस्कारसूत्रे शिरोधार्य मानली आहेत. कधी राष्ट्राला मातृभूमी म्हटले जाते, पितृभूमीही मानले जाते.

कोणाच्या जीवनावर आईचा, तर कोणावर वडिलांचा प्रभाव अधिक प्रमाणात आढळतो. जन्मपूर्व अवस्थेपासून माणसाला पाय फुटेपर्यंत तो आईच्या पुढ्यात असतो. ज्या वयात आधाराशिवाय जगता येत नाही त्या वयात हा एकमेव आधार असतो. त्या बाळाचे जीवन ही 'आई' या वृक्षाची पारंबी असते. पुढे वाढीच्या वयात घर मागे पडते व आई घरात राहते. मुलाचे मन हे आईचे घर बनते. मोकळ्या मैदानावर, उघड्या जगात, सामाजिक संदर्भात वडिलांची सोबत घडू लागते. मुलाच्या नावापुढे वडिलांचे आणि आईचे नाव लिहिले जाते. आईने वडिलांचे नाव पत्करलेले असते. वडिलांनी वाडवडिलांचे नाव स्वीकारलेले असते. ते मुलांपुरते वडिलार्जित होते.

आईच्या नावापुढे पदवी असेलच असे नाही. कधी ती नोकरी करणारी असते तर कधी नसते. त्यामुळे तिचे कधी वेगळे उत्पन्न असते तर कधी नसते. आपल्या वेगळेपणाचा त्याग करून मोकळेपणाने घरासाठी सर्वस्व अर्पण करणारी घरवेडी आई ही 'गृहदेवता' असते, गृहलक्ष्मी असते. तिच्याकडे कोणाचे लक्ष नसले तरी ती सर्वांकडे लक्ष देते. कुठून येते हे बळ तिच्यात ? बहुतेक तिच्या आईकडून प्राप्त होणारे ते मातृधन असावे.

**प्रश्नः**

१. 'अतिथी' या शब्दाचा अर्थ खालील पर्यायापैकी कोणता आहे ? **1**

अ) जास्त ब) तारीख

क) पाहुणा ड) भूतकाळ

२. सर्वसामान्यपणे व्यक्तीच्या जीवनावर कोणाचा प्रभाव पडतो ? **1**

अ) आई किंवा वडिलांचा ब) संस्कृतीचा

क) पैशाचा ड) थोर पुरूषांचा

३. मुलाला 'आई' या वृक्षाची पारंबी का म्हटले आहे ? **2**

४. आईला गृहदेवता का म्हटले आहे ? **2**

**Q.2. खालील प्रश्नांची उत्तरे गद्य उताऱ्याच्या साहाय्याने सोडवावीत.**

'जय जवान जय किसान' अशी घोषणा देऊन स्व. लालबाहादूर शास्त्री यांनी सैनिक आणि शेतकरी हे देशाचे दोन आधार असे मानले आहे. सैनिक ज्याप्रमाणे प्राणांचे बलिदान करून देशाचे रक्षण करतात. त्याचप्रमाणे शेतकरी अत्यंत कष्ट करून शेतात धान्य पिकवतात. भारतची अर्थव्ययस्था ही शेतीवर आधारित आहे. म्हणूनच शेतकऱ्याचा मान खूप मोठा

आहे. सर्वसामान्य माणसे शेतकऱ्याच्या जिवावर सुखाने दोन वेळा पोटभर जेवतो. शेतकरी शेतात दिवस-रात्र राबतो. शेतजमीन नांगरतो. पिकाची योग्य काळजी घेतो. खतांचा पुरवठा करून जमिनीचा कस वाढवतो. पण हे सर्व करत असताना त्याला किती कष्ट, अडचणी सोसाव्या लागतात. अनेक संकटांचा सामना करावा लागतो. कधी कधी पिकावर कीड पडते. कधी पावसाअभावी पीक करपते. कशावेळी शेतकऱ्याचे हाल कुणी पाहू शकत नाही.

देशाचे आधारस्तंभ म्हणून जरी शेतकऱ्याकडे पाहिले जात असले तरी त्यांना सुविधा पुरविणे, आधुनिक यंत्रे, बी-बियाणे पुरवणे, खतांचा पुरवठा करणे यासारखा गोष्टींकडे लक्ष पुरवले जात नाही. शेती हा अत्यंत महत्त्वाचा उद्योग असूनही सरकारचे, समाजाचे तेवढे लक्ष नाही म्हणूनच कितीतरी शेतकरी कर्जबाजारी होतात. कर्ज फेडता येत नाही म्हणून आत्महत्या करतात.

हे चित्र बदलले पाहिजे. शेतकऱ्यांना मुबलक पैसा मिळेल अशा सुविधा त्यांना पुरवल्या पाहिजेत. तरच शेतकरी देशाचे खरे आधार ठरू शकतील.

**प्रश्न :**

१. भारताची अर्थव्यवस्था कशावर आधारित आहे ? **1**

१. शेतकऱ्यांवर २. रोजगारीवर ३. शेतीवर

२. 'जय जवान जय किसान' अशी घोषणा कोणी केली ? **1**

३. देशाचे दोन आधार कोणाला मानले गेले ? का ? **2**

४. लालबहादूर शास्त्री यांच्या मते शेतकरी कर्जबाजारी का होतात ? **2**

## खंड 'ख'

**Q.3. खालीलपैकी एका विषयावर निबंध लिहा. (कोणतेही एक)** **7**

१. **निसर्ग - माझा सोबती**

**मुद्दे :** मानव निसर्गाचा घटक - निसर्गाचे रक्षण प्रथम कर्तव्य - दुर्लक्ष केले तर पृथ्वीचा नाश - रक्षण केले तर मानव वाचेल - खऱ्या अर्थाने सोबती - जीवन आनंदी - निसर्ग वाचवा पृथ्वी वाचेल - पर्यावरण संतुलन - निसर्गाशी मैत्री टिकवा.

२. **मला देव भेटला तर ....**

**मुद्दे :** ही कल्पना का सुचली ? - सर्वत्र फक्त प्रकाश - निसर्गाचे चक्र थांबेल - जीवन अस्ताव्यस्त - होणारे दुष्परिणाम - मानवाची स्थिती - तुम्ही अशावेळी कसे वागाल ? कल्पना भंयकर - शेवट.

३. **एका वृद्धाचे मनोगत**

**मुद्दे :** आश्रमातील दिवस - भूतकाळातील आठवणी - कुटुंबासाठी केलेली मेहनत - मुलांनी दिलेली वागणूक - आश्रमातील आनंदी वातावरण - समाधानी.

किंवा 7

**मुद्दे :** सिंह, कुत्रा व कोल्हा – मैत्री – शिकारीबाबत करार – शिकारीत तिघांचा सारखा वाटा हरीण दिसणे – पाठलाग – सिंहाने ठार मारणे – समान वाटे – सिंह नाकबूल – सिंहाचा वाटा कुत्र्याचा व कोल्ह्याचा वाटा एकट्या सिंहाने ताव मारणे – कुत्रा व कोल्हा दुबळे, अशक्त – शिकार दाखवूनही त्यादिवशी उपास – तात्पर्य.

**Q.4. खालील विषयावर पत्र लिहा.** **5**

१. दिपक/ दिपिका काळे, सहलप्रमुख, सरस्वती विद्यालय, तुळशीबाग, पुणे हा/ही मा. आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ, पुणे यांच्याकडे सहलीसाठी बसची मागणी करतो/करते. या पत्राचा नमुना तयार करा. (लिफाफा आवश्यक)

किंवा

२. कृणाल / कमल माने,१३५, साईसदन, सदाशिव पेठ, पुणे येथून रस्त्यावरील कचरापेटीची दुर्दशा मा.आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांना पत्र लिहून कळवत आहे. (लिफाफा आवश्यक)

**खंड 'ग'**

**Q.5. अ) खालील प्रश्नांची उत्तरे कंसातील सूचनेप्रमाणे सोडवा.** **4**

१. मला ही कविता समजली, पण ती पाठ झाली नाही. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)
२. तिने स्वयंपाक घाईघाईने उरकला. (सर्वनाम ओळखा)
३. आईने विनोबांना जेवायला वाढले. (क्रियापद ओळखा)
४. शाब्बास ! उत्तम यश मिळवलेस. (केवलप्रयोगी अव्यय ओळखा)

**Q.5. आ) पुढील वाक्ये कंसातील सुचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही दोन)** **2**

१. शेतकरी शेती कसतो. (प्रयोग ओळखा)
२. मुंग्यांनी वारूळ बांधले. (प्रयोग ओळखा)
३. तुम्ही ऐकलात का कधी ? (आज्ञार्थी करा)
४. आपल्यासारख्या सामान्यांना शब्दावाचून संवाद भावणार नाहीत. (प्रश्नार्थी करा)

**Q.5. इ) पुढील वाक्यातील काळ ओळखा. (कोणतेही दोन)** **2**

१. गाव खूप सुंदर होते.
२. भीम लाडू खात असतो.
३. मी बाजारात जाणार.

**Q.5. ई) पुढील शब्दांचे लिंग बदला.** **2**

१. आई - ...........  २. मामा - ...........
३. बादशहा - ...........  ४. मित्र - ...........

**Q.5.** उ) **पुढील शब्दांचे वचन बदला.** **2**

१. खुर्ची - ........... २. घर - ...........
३. व्याख्यान - ........... ४. पत्र - ...........

**Q.5.** ऊ) **पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **2**

१. झाड - ........... २. ठिकाण - ...........
३. नारळ - ........... ४. श्रीफळ - ...........

**Q.5.** ए) **पुढील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **2**

१. संवाद × ........... २. सुंदर × ...........
१. गरीब × .......... २. मान × ..........

**खंड 'घ'**

**Q.6.** अ) **योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही चार)** **4**

१. दोन .......... माणसांची गोष्ट सांगतात.
(अपरिचित, विद्वान, हुशार, चतुर)
२. माझं मन या ऋतूमधल्या नव्या वळणाबरोबर .......... चैतन्यमय झालं आहे.
(आनंदून, धुमारल्यासारखं, जादूसारखं, तरल)
३. १९७३ ला .......... तर्फे 'सोव्हिएत लँड नेहरू पुरस्कार' त्यांना मिळाला.
(अमेरिका, रशिया, सोव्हियत रशिया, पॅरिस)
४. रविवर्मा त्या .......... व्यक्तिमत्त्वाकडे भारल्यासारखा पाहत होता.
(भरदार, तेजस्वी, तेजःपुंज, दैवी)
५. कवी यशवंतांच्या एका कवितेचा .......... आला.
(परिचय, सारांश, संदर्भ, अर्थ)
६. मास्तरांची .......... तेरावी, चौदावीची मुलं अभ्यासत होती.
(चारोळी, कविता, कथा, कादंबरी)

**Q.6.** आ) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही सहा)** **6**

१. स्वामीजी अनाहूतपणे कोणाच्या घरी जात नसत?
२. नारायण सुर्वे कोणत्या मासिकाचे संपादक झाले?
३. वसंत ऋतूचा काय साजरा करावा, असे लेखिकेला वाटते?
४. दोन्ही विद्वान कशाची आदर्शावस्था म्हटली पाहिजे?
५. कोणती नदी रारंग ढांगला वळसा घालून वाहते?
६. 'घनचक्कर समाज' हे नाव कोणी सुचवले?
७. शहरात कशाचे प्रमाण कमी झालेले दिसते?
८. इतरांबरोबर गप्पा कधी अधिक रंगतात?

**Q.7.** अ) आकृतिबंध पूर्ण करा (कोणतेही तीन) **6**

१.




२.

| लेखकाच्या आईचा स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग | | |
|---|---|---|
| साल | .......... | .......... |
| आंदोलन | .......... | .......... |

३.




४.




५.



**Q.7.** आ) **खालील प्रश्नांची ३० ते ४० शब्दांत उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** **6**

१. जितकी ओळख कमी, जितकी व्यक्ती अपरिचित तितका संवाद अधिक रंगतो, असे का म्हटले आहे?

२. स्वामी विवेकानंद यांनी आपल्या हातचे भोजन स्वीकारावे यासाठी चेतूने आग्रह कसा केला?

३. निसर्गाशी संवाद साधायला हवा, असे लेखक का म्हणतो?

४. वसंत ऋतूच्या स्वागताची चाहूल लेखिकेस कशी मोहरून टाकते?

**Q.8. अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. (कोणतेही चार)** **4**

१. ...... सुख झालें । माझें माहेर भेटलें ।। (जीवा, मना, हृदया, अंतरी)

२. तिथे अन्न होऊन ठाकेल............. ! (घनश्याम, राम, श्याम, काम)

३. करीं .......... सांभाळु । अनाथांचा तू कृपाळू ।। (भक्तांचा, दीनांचा, पामरांचा, संतांचा)

४. कां ही ........ न सुटे यांची। (यातना, कामना, वासना, इच्छा)

५. असे विश्वकर्मा ............... पुजारी. (श्रमांचा, कष्टांचा,मेहनतीचा, घामाचा)

६. भावमय किमया ही .......... दौलतीची? (हृदयीच्या, मनाच्या, काळजाच्या, अंतरीच्या)

**Q.8.** आ) **खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** **3**

१. कवीच्या मते चिमण्यांच्या ओठी काय दिसेल?

२. सावळ्या रूपातील श्यामला कोणते गीत आवडते?

३. जन्मोजन्मी माणसाची काय होईल?

४. पांडुरंग कोणाचा सांभाळ करतो?

५. कवितेतील घरट्यात कोणती प्रभावळ नाचते?

**Q.9. अ) खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.** **3**

१. नाही माझ्या घरट्यात सातसूरांचा झंकार
मंद्र सप्तकात गाते एकतारी एकस्वर ।

२. अवघा निरसला शीण । देखतां संतचरण ।।
आजि दिवाळी दसरा । सेना म्हणे आले घरा ।।

३. 'वसे तो सदा स्वेदगंगेकिनारी'

**Q.9.** आ) **आकृतिबंध पूर्ण करा (कोणतेही दोन)** **4**

१.



२. मुरारी राहण्याचे ठिकाण

- ..........
- ..........

३. कवितेत आलेल्या सणांची नावे

- ............
- ............

**Q.10. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **4**

१. कोल्हापुरी गुळाचे वर्णन लेखकाने कसे केले आहे?

२. पाणी अडवा पाणी जिरवा - ही कल्पना स्पष्ट करा.

३. 'गावाची संस्कृती स्थानिक परंपरांतून निर्माण झालेली असते.' हे विधान पाठाच्या आधारे सोदाहरण स्पष्ट करा.

***Best of Luck***